CIDCO
WE MAKE CITIES

प्रसिद्धी पत्रक
PRESS NOTE

सिडको
शहरांचे शिल्पकार

CITY & INDUSTRIAL DEVELOPMENT CORPORATION OF MAHARASHTRA LTD.
**Regd. Office:** Nirmal, 2nd Floor, Nariman Point, Mumbai 400 021. Tel.: 91-22-6650 0900; FAX:91-22-6650 0933; www.cidcoindia.com
**Head Office:** CIDCO Bhavan, CBD Belapur, Navi Mumbai 400 614. Tel.: 91-22-6791 8241; Fax: 91-22-6791 8294;

For updated information, follow us on - @cidco_ltd :/cidco YouTube CIDCO Ltd. @cidco_ltd

**दिनांक :** 19.08.2021

## समृद्ध व संपन्न जिल्हा म्हणून पालघर जिल्हा स्वत:ची ओळख निर्माण करेल - मा. श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे

निसर्गाचे वरदान आणि ऐतिहासिक वारसा लाभलेला पालघर जिल्हा हा लवकरच एक समृद्ध व संपन्न जिल्हा म्हणून स्वत:ची ओळख निर्माण करेल, असे प्रतिपादन **मा. श्री. उद्धव बाळासाहेब ठाकरे**, मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी केले. मा. मुख्यमंत्र्यांच्या शुभहस्ते, सिडकोने विकसित केलेल्या पालघर जिल्हा मुख्यालय आणि नवनगर प्रकल्पाचे ऑनलाइन पद्धतीने ई-लोकार्पण करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

या ई-लोकार्पण सोहळ्याच्या कार्यक्रमाचे अध्यक्षपद **मा. श्री. अजित पवार**, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी भूषवले. या कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून **मा. श्री. बाळासाहेब थोरात**, मंत्री, महसूल, **मा. श्री. एकनाथ शिंदे**, मंत्री, नगर विकास, **मा. श्री. कपिल पाटील**, केंद्रीय राज्यमंत्री, पंचायती राज, **मा. श्री. दादाजी भुसे**, मंत्री, कृषि तथा पालकमंत्री, पालघर जिल्हा, **मा. श्री. हसन मुश्रीफ**, मंत्री, ग्राम विकास आणि **मा. श्री. दिलीप वळसे पाटील**, मंत्री, गृह यांची उपस्थिती लाभली. या कार्यक्रमाला विशेष अतिथी म्हणून **मा. प्राजक्त तनपुरे**, राज्यमंत्री, नगर विकास, **मा. श्री. शंभूराज देसाई**, राज्यमंत्री, गृह (ग्रामीण) आणि **मा. श्री. अब्दुल सत्तार**, राज्यमंत्री, महसूल व ग्रामविकास हे मान्यवर उपस्थित होते. तर सन्माननीय अतिथी म्हणून **मा. श्रीमती वैदेही वाढाण**, अध्यक्ष, जिल्हा परिषद, पालघर, **मा. श्री. रविंद्र फाटक**, विधानपरिषद सदस्य, **मा. ॲड. निरंजन डावखरे**, विधानपरिषद सदस्य, **मा. श्री. राजेंद्र गावित**, लोकसभा सदस्य, पालघर, **मा. श्री. क्षितीज ठाकूर**, विधानसभा सदस्य, **मा. श्री. हितेंद्र ठाकूर**, विधानसभा सदस्य, **मा. श्री. बाळाराम पाटील**, विधानपरिषद सदस्य, **मा. श्री. विनोद निकोले**, विधानसभा सदस्य, **मा. श्री. दौलत दरोडा**, विधानसभा सदस्य, **मा. श्री. शांताराम मोरे**, विधानसभा सदस्य, **मा. श्री. राजेश पाटील**, विधानसभा सदस्य, **मा. श्री. श्रीनिवास वनगा**, विधानसभा सदस्य आणि **मा. श्री. सुनिल भुसारा** हे मान्यवर उपस्थित होते. **मा. श्री. सीताराम कुंटे**, मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य आणि **डॉ. संजय चहांदे**, अपर मुख्य सचिव व पालक सचिव, पालघर यांची या कार्यक्रमाला विशेष उपस्थिती लाभली. त्याचप्रमाणे, **डॉ. संजय मुखर्जी**, उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, सिडको, **डॉ. कैलास शिंदे**, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको, **श्री. राजेंद्र धयाटकर**, मुख्य

अभियंता (नमुंआंवि), सिडको, **श्री. प्रकाश सेवतकर**, अधीक्षक अभियंता, पालघर तसेच सिडकोतील विभाग प्रमुख आणि अधिकारी हेही या प्रसंगी उपस्थित होते.

पालघर जिल्हा मुख्यालयाच्या सौंदर्यपूर्ण व कल्पक स्थापत्याची प्रशंसा करून, या मुख्यालयामुळे जनतेचे बहुतांशी प्रश्न स्थानिक पातळीवरच सोडविण्यास मदत होईल, असे मत मा. मुख्यमंत्र्यांनी व्यक्त केले. पालघर जिल्ह्याचा ऐतिहासिक वारसा जपून जिल्ह्याचा विकास घडेल आणि हा जिल्हा देशातील सर्वोत्तम जिल्ह्यांमध्ये गणला जाईल, असा विश्वासही मा. मुख्यमंत्र्यांनी या प्रसंगी व्यक्त केला.

मा. श्री. अजित पवार, उपमुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांनी पालघर जिल्हा मुख्यालयाच्या निर्मितीमुळे नागरिकांना प्रशासकीय सेवा सुलभरीत्या उपलब्ध होऊन, जिल्ह्याच्या विकासाच्या प्रक्रियेला वेग प्राप्त होईल व येथील नागरिकांचे जीवमान उंचावेल, असा विश्वास व्यक्त करत या प्रकल्पाबद्दल सिडकोचे अभिनंदन केले.

श्री. एकनाथ शिंदे, मंत्री, नगर विकास यांनी या प्रसंगी बोलताना सदर जिल्हा मुख्यालयामुळे जिल्हा स्तरावरील कार्यालये एकाच ठिकाणी उपलब्ध झाल्यामुळे, जिल्ह्यातील लोकांना याचा निश्चितच मोठा लाभ होणार असल्याचे सांगत हे मुख्यालय संपूर्ण देशात आयकॉनिक ठरेल, असे प्रतिपादन केले.

श्री. बाळासाहेब थोरात, मंत्री, महसूल यांनी सदर जिल्हा मुख्यालयामुळे जिल्हा स्तरावरील अनेक कार्यालये एकाच ठिकाणी आल्याने लोकांना उत्कृष्ट प्रशासकीय सेवांचा लाभ मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

श्री. दिलीप वळसे पाटील, मंत्री, गृह यांनी पालघर जिल्हावासियांना एक सुंदर व भव्य जिल्हा मुख्यालय लाभले असल्याचे सांगत, दूरगामी नियोजन करून विकसित करण्यात आलेल्या या प्रकल्पाबद्दल सिडकोचे अभिनंदन केले.

श्री. दादाजी भुसे, मंत्री, कृषि तथा पालकमंत्री, पालघर जिल्हा यांनी सिडकोकडून विकसित करण्यात आलेले पालघर जिल्हा मुख्यालय हे देशातील सुनियोजित जिल्हा मुख्यालयांपैकी सर्वोत्तम ठरेल, असा विश्वास व्यक्त केला.

डॉ. संजय मुखर्जी यांनी आपल्या स्वागतपर भाषणामध्ये पालघर जिल्हा मुख्यालयाच्या लोकार्पणाचा हा क्षण पालघर जिल्हावासियांबरोबच सिडकोसाठीही आनंदाचा क्षण असल्याचे सांगत, राज्य शासनाने सिडकोवर ज्या विश्वासाने ही जबाबदारी सोपविली ती सार्थ ठरवत सिडकोकडून सुनियोजित पालघर जिल्हा मुख्यालय विकसित करण्यात आल्याचे सांगितले.

ठाणे जिल्ह्याचे विभाजन होऊन 2014 मध्ये पालघर हा महाराष्ट्रातील 36 वा जिल्हा म्हणून अस्तित्वात आला. त्यानंतर महाराष्ट्र शासनाने 2016 मध्ये 440 हेक्टरवर पालघर नवनगर व त्यापैकी 103 हेक्टरवर पालघर जिल्हा मुख्यालय विकसित करण्याकरिता सिडकोची 'नवीन शहर विकास प्राधिकरण' म्हणून नियुक्ती केली. या प्रकल्पांतर्गत सिडकोकडून जिल्हा स्तरावरील, जिल्हा परिषद कार्यालय, पोलीस अधीक्षक कार्यालय,

जिल्हाधिकारी कार्यालय, नवीन प्रशासकीय इमारत, कर्मचाऱ्यांसाठी निवासस्थाने, शासकीय विश्रामगृह, सभागृह इ. महत्त्वाच्या इमारतींसह रस्ते, पदपथ, पाणी पुरवठा व मलनि:सारण, विद्युत पुरवठा इ. मूलभूत पायाभूत सुविधा विकसित करण्यात आल्या आहेत. जिल्हा मुख्यालयाकरिता विकसित करण्यात आलेल्या इमारतींची रचना वैशिष्ट्यपूर्ण असून आधुनिक व स्थानिक वास्तुशास्त्राचा संगम, वायुविजनास अनुकूल व उर्जा संचयी, पावसाच्या पाण्याची साठवण (रेन वॉटर हार्वेस्टिंग), उष्णतेला अटकाव करण्यासाठी आच्छादने ही या इमारतींची वैशिष्ट्ये आहेत. याशिवाय प्रशस्त पदपथ, भव्य वाहनतळ, इमारतींभोवती हरित स्थाने जिल्हा मुख्यालयाच्या ठिकाणी विकसित करण्यात आली आहेत.

जिल्हा मुख्यालयाच्या या ठिकाणाला पालघर बोईसर राज्य महामार्ग आणि विरार-डहाणू रेल्वे मार्ग यांमुळे उत्तम संधानता (कनेक्टिव्हिटी) लाभली आहे. यामुळे जिल्ह्यातील नागरिकांना हे ठिकाण ये-जा करण्याकरिता सोयीचे आहे.

या सोहळ्याचे आभारप्रदर्शन **डॉ. कैलास शिंदे**, सहव्यवस्थापकीय संचालक, सिडको यांनी केले.

- - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - - -

मा. संपादक महोदय,
वरील बातमीस आपल्या लोकप्रिय वर्तमानपत्रातून ठळक प्रसिद्धि देऊन उपकृत करावे, ही विनंती.

**जनसंपर्क विभाग, सिडको**